INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 10 | NOVEMBER - 2023

# ''प्रभुत्व अध्ययन प्रतिमानाचा इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाच्या संपादणूकीवर होणारा परिणाम अभ्यासणे''

प्राचार्य डॉ. माणिक मारोतराव जोगवे,
आर.बी. एम. अध्यापक महाविद्यालय, हट्टा, ता. वसमत, जि. हिंगोली.



अध्यापनाची कोणतीही एकच पध्दत सर्वश्रेष्ठ मानता येणार नाही. कारण कोणतीही पध्दत कितीही चांगली असलीतरी सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यासाठी आणि सर्व विषयासाठी तिचा उपयोग होवू शकत नाही. अध्ययनाचेही विविध प्रकार असतात. त्यानुसार अध्यापनाच्या पध्दती वापरणे इष्ठ ठरते.

बदलत्या काळानुसार अध्यापनाची तंत्रेही बदलावी लागतात. एकेवेळी हर्बटची पंचपदी हा अध्यापनातील मापदंड समजला जात असे. धोकंमपट्टी म्हणजे शिक्षण हाही समज प्रचलीत होता. नंतरच्या काळात शिक्षणाच्या व्याख्येतच अनेक बदल झाले. जसजशी शिक्षणाची व्याख्या बदलली तसतसा अभ्यासक्रमही बदलला व अध्यापनाचे तंत्रेही बदलले. अध्यापन अधिक कौशल्यपुर्ण होण्यासाठी सुक्ष्म अध्यापनाचा उदय झाला. समवयस्कावर पाठ घेण्याची पध्दत सुरू झाली. शारीरीक शिक्षण, कला शिक्षण, व्यवसाय उपयोगी शिक्षण यामुळे शिक्षणाचा व्याप वाढला.

Robort Gange असा विश्वास व्यक्त करतात की, ''केवळ अध्ययन उपपत्तीच्या आधारे अध्ययन प्रक्रियेचे स्पष्टीकरण देता येणार नाही. प्रभावी अध्यापनासाठी प्रतिमाने हा महत्वाचा टप्पा आहे''

ब्रुस जॉयस व मार्शविल या अमेरिकन शिक्षणतज्ञांनी Model of Teaching या पुस्तकात बावीस अध्यापन प्रतिमाने दिली आहेत. या अध्यापन प्रतिमानाची ओळख अमेरिका व इतर प्रगत देशातील शिक्षकांना सुमारे ३० वर्षापुर्वीच झाली आहे मात्र भारतात १२—१५ वर्षापासून याबाबत चर्चा होऊ लागली आहे.

इंग्रजी हा सर्वच विषयाचा पाया आहे. इंग्रजीला शालेय स्तरावर विशेष स्थान असुनही या विषयाच्या अध्यापनाकडे विशेष लक्ष पुरविले जात नाही. प्रत्यक्षात इंग्रजीचे अध्यापन हे माहितीद्वारे व सूचनाद्वारे सांगणारे आहे. इंग्रजी हा विषय मुर्त व अमुर्त असल्यामुळे माध्यमिक शाळेतील विद्यार्थी हे केवळ नियमाद्वारे अध्यापन करू शकत नाही. अध्यापनाच्या सद्य:स्थितीचा विचार केल्यास अध्यापन हे आशय केंद्रित आहे. कारण परिक्षा पध्दतीच आशय केंद्रित आहे. आशयाचा व शिक्षणाच्या ध्येयांचा फारसा ताळमेळ बनलेला दिसत नाही. सध्याचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे युग आहे. कोणत्याही विषयाचे अध्ययन हे अध्यापनाची फलनिष्पत्ती मानली जात आहे. चांगल्या अध्यापनामुळेच विद्यार्थ्याला आशय आकलनास मदत होते. शब्द उच्चार Spelling योग्य लिहतात, शब्द पाठ करतांना व त्याचे अर्थ कसे ध्यानात ठेवावे, शिक्षकाचे बोलणे, हालचाल, हावभाव, फलकलेखन या सर्वच कृतीचे निरिक्षण विद्यार्थी करत असतात म्हणून अध्यापनाची प्रक्रिया आदर्श असणे आवश्यक आहे.

### प्रभुत्व अध्ययन प्रतिमान:—

प्रभुत्व अध्ययन प्रतिमान डॉ. बेंझामीन ब्लूम यांनी विकसित केलेले आहे. ब्लूम हे विद्यार्थ्याने केलेल्या अध्ययनापेक्षा त्याने त्या अध्ययन घटकावर किती प्रभुत्व मिळवले या बाबतीत अधिक रस घेतात.

### संशोधन समस्येची गरज:—

१. प्रत्येक घटकाचे पारंपारिक पध्दतीने अध्यापन करता येत नाही म्हणून प्रभूत्व अध्ययन प्रतिमानाच्या साहाय्याने अध्यापन करण्याची गरज भासते.
२. प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येक संकल्पनांवर प्रभुत्व प्राप्त करावे यासाठी संशोधनाची गरज आहे.
३. विद्यार्थ्यांना स्वत:च्या गतीनुसार व क्षमतेनुसार अध्ययन करण्यात संधी व प्रेरणा देणे आवश्यक आहे व त्यासाठी प्रभुत्व अध्ययन प्रतिमानाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर काय परिणाम होतो हे अभ्यासणे आवश्यक आहे.
४. पुरेसा वेळ व योग्य मार्गदर्शन दिल्यास सर्व सामान्य विद्यार्थी सुध्दा अध्ययनातील अपेक्षित पातळी गाठू शकतो. हे निदर्शनास आणण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

### संशोधन समस्येचे महत्व:—

१. इंग्रजी भाषेचे अध्यापन प्रभावी करण्यासाठी.
२. विद्यार्थ्यांच्या अध्ययनात सुलभता आणण्यासाठी.
३. इंग्रजी विषय शिकवितांना प्रभुत्व अध्ययन प्रतिमानाची उपयुक्तता पाहण्यासाठी.
४. इंग्रजी भाषेच्या कौशल्य अध्यापनात प्रभुत्व अध्ययन प्रतिमानाची उपयुक्तता पाहण्यासाठी.
५. विद्यार्थ्यांना स्वयंअध्यनास प्रेरित करण्यास उपयुक्त आहे.

### संशोधन समस्येचे विधान/शीर्षक:—

प्रभुत्व अध्ययन प्रतिमानाचा इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाच्या संपादणूकीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

### संशोधनाचे उद्दिष्टये:—

१. इंग्रजी विषयात वापरल्या जाणाऱ्या पारंपारिक पध्दतीचा अभ्यास करणे व विद्यार्थ्यांच्या संपादनावर होणारा परिणाम अभ्यासणे.
२ विद्यार्थ्यांना प्रभुत्व अध्ययन प्रतिमानाद्वारे अध्यापन करणे व विद्याथ्यांच्या संपादनावर होणारा परिणाम अभ्यासणे.
३. पारंपारिक अध्यापन व प्रभुत्व अध्ययन प्रतिमानाच्या सहाय्याने केलेल्या अध्यापनामुळे विद्यार्थ्यांच्या संपादणुकीवर होणाऱ्या परिणामाची तुलना करणे.
४. प्रभुत्व अध्ययनासंदर्भात अध्ययन सामुग्री विकसित करणे.

### संशोधनाची गृहितके:—

१. पाठयपुस्तकातील पाठाची रचना काठीण्य पातळीनुसार आहे.
२. इंग्रजी विषयाच्या अध्यापनाची प्रचलित पध्दती सदोष आहे.
३. पाठाची रचना समकेंद्री आहे.

### संशोधनाची परिकल्पना :—

**१. संशोधन परिकल्पना:**

प्रभुत्व अध्ययन प्रतिमानाद्वारे इंग्रजीचे अध्यापन हे पारंपारिक अध्यापन पध्दतीपेक्षा अधिक परिणामकारक असते.

२. **शुन्यपरिकल्पना :**

पारंपारिक पध्दतीने व प्रभुत्व अध्ययन प्रतिमानाच्या सहाय्याने होणाऱ्या अध्यापनामुळे विद्यार्थ्यांच्या संपादनावर सार्थक फरक पडत नाही.

संशोधन समस्येतील तांत्रिक शाळांच्या कार्यात्मक व्याख्या:

१. प्रभुत्व अध्ययन:

एखादया घटकाचे किंवा कौशल्याचे निर्धारित केलेल्या प्रभुत्व पातळी पर्यंत अध्ययन करणे व त्यामुळे प्रभुत्व मिळविणे या प्रक्रियेस प्रभुत्व अध्ययन म्हणतात.
लोकभारती शब्दकोष, आचार्य रामचंद्र वर्मा

२. **प्रतिमान:**

वर्गातील अध्यापन व अध्यापनासाठी वापरण्याचे साहित्य यांचे नियोजन करण्यासाठी वापरलेला आराखडा म्हणजे प्रतिमान होय.
अध्यापनाची प्रतिमाने,वासंती फडके

**३.इयत्ता आठवी :**

महाराष्ट्र राज्य शासनाने निर्गमीत केलेल्या इयत्ता ७ वी पास होऊन आठवीच्या वर्गात अध्ययन करत असलेले विद्यार्थी.
शिक्षण संक्रमण, ऑगस्ट, २००६

**४.इंग्रजी:**

महाराष्ट्र माध्यमिक शाळा संहितेने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमातील विषय.
शिक्षण संकलन, ऑगस्ट, २००६

**५.अध्यापन:**

Teaching is a act interpersonal influence aimed at changing the ways in which other persons can or well behaved.

- Gange

प्रस्तुत संशोधनातील संकल्पनात्मक व्याख्यांचा, कार्यात्मक व्याख्या म्हणून स्वीकार केला आहे.

**संशोधन पध्दती:—**

प्रस्तुत संशोधनाकरिता प्रायोगिक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला. सदरील संशोधनासाठी प्रस्तुत अध्ययन प्रतिमानाचा इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाच्या संपादणूकीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

प्रयोगामध्ये अध्यापन पध्दती हे स्वाश्रयी चल अस्थीर होऊन इतर चले स्थिर ठेवण्यात आली आहे. आणि त्यामुळे स्वाश्रयी चलाचा आश्रयी चलावर कोणता परिणाम होतो याचा अभ्यास केला आहे.

**संशोधाची साधने:—**

संशोधनामध्ये माहिती संकलनासाठी उत्तर चाचणी तयार करण्यात आली. त्या आधारे प्रायोगिक आणि नियंत्रित गटातील विद्यार्थ्यांच्या संपादणूकीचा अभ्यास करण्यात आला.

**माहिती विश्लेषणाची साधणे:—**

संशोधनात वापरलेली संख्यात्मक परिमाणे खालीलप्रमाणे.

१. मध्यमान

२. प्रमाण विचलन

३. t चाचणी ( टी परीक्षीका)

याद्वारे संशोधनाचे निष्कर्ष काढण्यात आले.

**संशोधन समस्येशी निगडीत चले:—**

प्रस्तुत संशोधनातील आश्रयी आणि स्वाश्रयी चले खालीलप्रमाणे आहेत.

**अ. स्वाश्रयी चले:—**

**१. अध्यापन पध्दती:**

या ठिकाणी प्रायोगिक गटासाठी प्रभुत्व अध्ययन प्रतिमान आणि नियंत्रित गटासाठी हर्बटच्या पंचपदीनुसार अध्यापन ही स्वाश्रयी चले आहेत.

**२. शाळा:**

प्रयोगासाठी निवडलेली शाळा आणि वर्ग हे स्वाश्रयी चले आहेत.

**३. पाठयघटक :**

दोन्ही गटासाठी Letter Writing हा पाठयघटक निवडला आहे.

**ब. आश्रयी चले:—**

विद्यार्थ्यांना उत्तरचाचणीत मिळालेले गुण हे आश्रयी चले आहेत. या शिवाय इतर बाहय चले ही स्थीर गृहीत धरली आहेत.

**प्रस्तुत संशोधनातील न्यादर्श:—**

प्रस्तुत संशोधनात अहेरी शहरातील राजे धर्मराव कृषी विद्यालयातील ८ वी 'अ' तुकडी प्रायोगिक गट म्हणून निवडण्यात आली तर 'ब' तुकडी ही नियंत्रित गट म्हणून निवड करण्यात आली दोन्ही वर्गातील प्रत्येकी २० विद्यार्थी अशा एकूण ४० विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली.

**न्यादर्श निवड पध्दती :—**

प्रस्तुत संशोधनामध्ये नमुना निवडीसाठी संभाव्य आणि असंभाव्य दोन्ही पध्दतीचा वापर केला आहे.

| अ.क्र. | न्यादर्श | पध्दती | प्रकार |
|---|---|---|---|
| १. | शाळा | असंभाव्य पध्दती | सहेतुक नमुना निवड |
| २. | वर्ग | संभाव्य पध्दती | यादृच्छिक नमुना निवड |
| ३. | पाठयघटक | असंभाव्य पध्दती | सहेतुक नमुना निवड |

**निष्कर्ष :—**

१) पारंपारिक पध्दतीने व प्रभुत्व अध्ययन प्रतिमान पध्दतीने अध्यापन केल्यानंतर प्रभुत्व अध्ययन प्रतिमान पध्दती ही अधिक श्रेष्ठ ठरली.

२) प्रभुत्व अध्ययन प्रतिमान पध्दतीने अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये आशयावर प्रभुत्व क्षमता निर्माण झाली.

३) पारंपारिक पध्दतीने अध्यापन केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये प्रभुत्व क्षमता सामान्य असल्याने आढळून आले. परंतु आशयावर विशिष्ट पातळी पर्यंत पोहचण्याची क्षमता निर्माण झाली नाही.

४) शालेय स्तरावरील इंग्रजी हे मुलभुत स्वरूपाचे असल्यामुळे त्यातील मुलभुत संकल्पना, शब्द, अर्थ, विश्लेषण, आशय आकलन विद्यार्थ्यांना समजावे आणि त्यावर प्रभुत्व रहावे यासाठी इंग्रजी विषयाच्या अध्यापनासाठी प्रभुत्व अध्ययन प्रतिमान उपयुक्त आहे.

## संदर्भ ग्रंथसुची:—

१. बापट,भा.गो.,(१९९८), शैक्षणिक संशोधन, तृतिय आवृती,नुतन प्रकाशन, पुणे.
२. भांडारकर,के.म.,(१९९८), सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, नुतनप्रकाशन, पुणे.
३. भितांडे वि.रा., (१९९९), शैक्षणिक संशोधन पध्दती, सुधारित आवृत्ती, नुतन प्रकाशन पुणे.
४. फडके, वासंती., (१९९८), अध्यापन प्रतिमाने, प्रथम आवृत्ती, नुतन प्रकाशन, पुणे.
५. जगताप, ह.ना., (२००४), प्रगत शैक्षणिक तंत्रविज्ञान आणि माहिती तंत्रविज्ञान, सुधारित चतुर्थ आवृत्ती, नुतन प्रकाशन, पुणे.
६. पंडित ब.बी., (१९८९), शिक्षणातील संशोधन आभिकल्प, प्रथम आवृत्ती, नुतन प्रकाशन, पुणे.
७. उमाटे, वि.तु.,व मुळे., रा.रा., (१९९८), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे,तिसरी आवृत्ती, विद्या बुक्स, औरंगाबाद.